महाराष्ट्र शासन

सर्व शिक्षा अभियान जिल्हा परिषद जालना
कंत्राटी तत्वावर अंशकालीन निदेशक भरती २०१४
जाहीरात क्रमांक ०१ /२०१४

सर्व शिक्षा अभियान जि.प. जालना अंतर्गत कंत्राटी तत्वावर अंशकालीन निदेशक यांची पदे भरण्याकरीता विहीत शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करणा-या पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनेच www.zpjalna.org या संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात	ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत
दिनांक २५/१० /२०१४	दिनांक ०१/११/२०१४ सायंकाळी ५.०० पर्यंत

भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहीरात www.zpjalna.org या संकेतस्थळावर उपलब्ध असुन उमेदवारांनी संपूर्ण माहिती काळजीपूर्वक समजुन घेऊनच ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदाकरीता केवळ उक्त संकेतस्थळावरुन विहीत ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज व विहीत चलनाव्दारे भरलेले परीक्षा शुल्क ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

भरती प्रक्रिया / परीक्षा स्थगित करणे किंवा रद्य करणे , अंशतः बदल करणे , पदांच्या एकूण किंवा संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकारी जिल्हा निवड समिती जि.प. जालना यांनी राखुन ठेवलेला आहे त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही.

रिक्त पदांचा तपशील व आवश्यक शैक्षणिक अर्हता / अनुभव

खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव दि ३०/१०/२०१४ या दिनांकास प्रमाणपत्रासह पूर्ण धारण करणे आवश्यक आहे.

अ.क्र.	पदाचे नाव	पदसंख्या	जात प्रवर्ग	मंजूर पदे	समांतर आरक्षण						शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता
					महिला ३०%	माजी सैनिक १५%	प्रकल्प/ भूकंपग्रस्त ५%	अपंग ३%	खेळाडू ५%	अंशकालीन १०%	
१	कला शिक्षक	४२	SC	५	२	१	०	०	०	१	१.एटीडी/बीएफए/एएमही व्यावसायिक पात्रता अथवा २. नृत्य,गायन किंवा वादन विषयातील गंधर्व महाविद्यालयाची किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची विशारद पदवी अथवा समकक्ष अर्हता
			ST	३	१	०	०	०	०	०	
			VJA	२	१	०	०	०	०	०	
			NT B	१	०	०	०	०	०	०	
			NTC	२	१	०	०	०	०	०	
			NTD	१	०	०	०	०	०	०	
			SBC	१	०	०	०	०	०	०	
			OBC	८	२	१	०	०	०	१	
			ESBC	७	२	१	०	०	०	१	
			SBC A	२	१	०	०	०	०	०	
			OPEN	१०	३	१	१	०	०	१	
२	शारीरीक शिक्षण व आरोग्य	४२	SC	५	२	१	०	०	०	१	१.कला,वाणिज्य,विज्ञान शाखेतील पदवी किंवा समकक्ष शैक्षणिक अर्हता आणि २. बीपीएड/बीएड फिजीकल अथवा समकक्ष व्यावसायिक पात्रता
			ST	३	१	०	०	०	०	०	
			VJA	२	१	०	०	०	०	०	
			NT B	१	०	०	०	०	०	०	
			NTC	२	१	०	०	०	०	०	
			NTD	१	०	०	०	०	०	०	
			SBC	१	०	०	०	०	०	०	
			OBC	८	२	१	०	०	०	१	
			ESBC	७	२	१	०	०	०	१	
			SBC A	२	१	०	०	०	०	०	
			OPEN	१०	३	१	१	०	०	१	

३	कार्यशिक्षण (कार्यानुभव)	४२	SC	५	२	१	०	०	०	१	१. कला,वाणिज्य,विज्ञान शाखेतील पदवी किंवा समकक्ष शैक्षणिक अर्हता आणि २. हस्तकला व कार्यानुभव शिक्षण प्रमाणपत्र (Teacher in Handicraft & work Experience) ही व्यावसायिक पात्रता
			ST	३	१	०	०	०	०	०	
			VJA	२	१	०	०	०	०	०	
			NT B	१	०	०	०	०	०	०	
			NTC	२	१	०	०	०	०	०	
			NTD	१	०	०	०	०	०	०	
			SBC	१	०	०	०	०	०	०	
			OBC	८	२	१	०	०	०	१	
			ESBC	७	२	१	०	०	०	१	
			SBC A	२	१	०	०	०	०	०	
			OPEN	१०	३	१	१	०	०	१	

1. वरील सर्व पदे खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन भरावयाची आहेत.
2. वरील जाहीरातीतील पदसंख्येत दर्शविल्याप्रमाणे दि ३०/०९/२०१३ च्या यु डाईस डाटानुसार जालना जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या ४२ शाळांमध्ये कला, शिक्षण, शारीरीक शिक्षण व आरोग्य, कार्यशिक्षण (कार्यानुभव) या विषयांचे अध्यापन करण्यासाठी प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र या प्रमाणे १२६ अंशकालीन निदेशकांची पदे कंत्राटीपध्दतीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर नियुक्त करावयाची आहेत.
3. जाहीरातीत नमुद अक्र १ ते ३ पदांसाठी उमेदवाराचे वय अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या तारखेस १८ पेक्षा कमी नसावे व खुल्या प्रवर्गातील उमेदवारांचे वय ३३ वर्ष व मागासवर्गीय उमेदवारांसाठी वय ३८ पेक्षा जास्त नसावे. अंशकालीन कर्मचा-यांसाठी प्रचलित नियमानुसार वयाची अट शिथिलक्षम राहील.
4. समांतर आरक्षण प्रचलित नियमानुसार अनुज्ञेय राहील.
5. सर्व शिक्षा अभियान अंतर्गत वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकात भारत सरकारने मंजूर केलेल्या तरतूदीच्या मर्यादेत अंशकालीन निदेशकांना प्रति तासिका रु ५०/- याप्रमाणे दरमहा रु ५०००/- या कमाल मर्यादेत मानधन अनुज्ञेय राहील. सदर पदावरील नियुक्त्या कंत्राटी तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाच्या असुन सदर विषयाचा कार्यभारत विचारात घेऊन घडयाळी तत्वावर असल्याने त्यावरील नियुक्त उमेदवारांना सेवेत कायम करण्याचा व नियमित सेवेचा कोणताही लाभ अनुज्ञेय रहाणार नाही.
6. पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा ही १०० गुणांची राहील. त्यात सामान्य ज्ञान, कला,क्रिडा,शालेय आरोग्य,कार्यानुभव, इंग्रजी गणित या विषयांचा अर्तभाव असेल. लेखी परीक्षेसाठी उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता अनुज्ञेय रहाणार नाही.
7. लेखी परीेक्षेत प्राप्त गुणांचा विचार करुन पदनिहाय , संवर्गनिहाय गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल व त्यानुसार गुणानुक्रमे पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. सदर नियुक्तीचा कालावधी शैक्षणिक सत्रापुरता मर्यादित राहील. अंशकालीन निदेशकाचे काम समाधानकारक असल्यास नविन शैक्षणिक सत्र सुरु झाल्यानंतर पुर्ननियुक्ती देण्यात येईल. सदरील शासन निर्णय निर्गमित दिनांकापासुन दि ३१ मार्च २०१७ पर्यंत लागू राहील.
8. एखाद्या उच्च प्राथमिक शाळेतील ६ वी ते ८ वी च्या वर्गाची पटसंख्या १०० पेक्षा कमी झाल्यास अंशकालीन निदेशकांच्या सेवा आपोआप संपुष्टात येतील. जिल्हयातील स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत चालविण्यात येणा-या जि.प. ४२ उच्च प्राथमिक शाळांमध्ये नियुक्त करावयाच्या १२६ अंशकालीन निदेशकांच्या मानधनासाठी येणारा खर्च केंद्ग पुरस्कृत सर्व शिक्षा अभियान या योजनेतुन भागविण्यात येईल.
9. उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
10. भरती प्रक्रियासंदर्भातील सविस्तर जाहीरात www.zpjalna.org या संकेतस्थळावर उपलब्ध असुन उमेदवाराने संपूर्ण माहिती काळजीपूर्वक वाचुन व समजावुन घेऊनच ऑनलाइन पध्दतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरीता केवळ उक्त संकेतस्थळावरुन विहीत ऑनलाईल पध्दतीने भरलेले अर्ज व विहीत चलनाव्दारे भरलेले परीक्षा शुल्क ग्राहय

धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळावर भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

11. खुल्या प्रवर्गातील महिला व अनु. जाती / जमातीचे उमेदवार वगळून अन्य मागासवर्गीय उमेदवाराकडे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

12. उमेदवाराने ज्या राखीव प्रवर्गासाठी अर्ज केला आहे त्याचे जात प्रमाणपत्र अनिवार्य राहील व जात वैधता प्रमाणपत्र उमेदवाराकडे असणे आवश्यक राहील.

13. यापुर्वी कंत्राटी पध्दतीने शाळा व्यवस्थापन समितीमार्फत नियुक्त केलेल्या अंशकालीन निदेशकांनासुध्दा पात्रतेच्या अधिन राहुन परीक्षा देता येणार असुन परीक्षेत प्राप्त गुणांवर व त्यांच्या यापुर्वीच्या अंशकालीन निदेशकाच्या अनुभवासाठी शासन निर्णय दि २१/०८/२०१४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अंशकालीन निदेशकाच्या अनुभवासाठी भारांकन अनुज्ञेय राहील.

14. लेखी परीक्षा दि 11/11/2014 रोजी जिल्हयातील परीक्षा केंद्गांवर घेण्यात येईल. लेखी परीक्षेचा दिनांक व वेळ लेखी परीेक्षेचे केंद्ग , परीक्षा क्रमांक इ. बाबी परीक्षेच्या प्रवेशपत्रावर नमूद करण्यात येतील. सदर प्रवेशपत्र उपरोक्त संकेतस्थळावरुन परीक्षेपुर्वी उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. उमेदवारांना लेखी परीक्षेसंदर्भात कोणत्याही प्रकारच्या लेखी सूचना / परीक्षेसंदर्भात पत्रव्यवहार या कार्यालयाकडून केला जाणार नाही. लेखी परीक्षेचा निकाल संकेतस्थळावर दि १३/११/२०१४ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची पडताळणी दि १४/११/२०१४ रोजी सकाळी ९.०० वा. कै. यशवंतराव चव्हाण सभागृह जि.प. जालना येथे करण्यात येईल

15. नियुक्तीची पदस्थापना, पदस्थापनेतील बदलासाठी निवड समितीवर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अशा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.आरक्षणात बदल करणे, पदांची संख्या कमी / जास्त होणे, जाहीरात रद्द करणे इ. अधिकार जिल्हा निवड समितीने राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप व कार्यक्रम

1. लेखी परीक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ट बहुपर्यायी स्वरुपाची असेल.
2. लेखी परीक्षा १०० गुणांची राहील. त्यात सामान्य ज्ञान, कला,क्रिडा,शालेय आरोग्य,कार्यानुभव, इंग्रजी गणित या विषयांचा अर्तभाव असेल.
3. गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकूण ्गुणांच्या किमान ४५% गुण प्राप्त करणे अनिवार्य राहील.

लेखी परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणाच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवड केली जाईल व अशा उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही. लेखी परीक्षा, कागदपत्रे छाननी इ करीता प्रवेशपत्र , कार्यक्रम, विविध सूचना या केवळ संकेतस्थळावरुनच उपलब्ध करण्यात येतील. पोस्टाव्दारे पाठविण्यात येणार नाहीत सबब सदर संकेतस्थळाला वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती/कार्यक्रमाबाबत अद्यावत राहण्याची प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

पदांच्या निवडीसाठी कार्यपद्धती, अटी, शर्ती.

1. लेखीपरीक्षेअंती उमेदवारांचे प्राप्त गुण, जाहिरातीनूसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मूळ कागदपत्र पडताळणी करण्याकरिता अंतरिम स्वरुपात यादि जाहीर करण्यात येईल. ज्या उमेदवारांची जाहिरातीनूसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती, परिक्षा शुल्क, मूळ कागदपत्रांच्या आधारे परीपुर्ण सिद्ध होईल अशाच उमेदवारांचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्या करीता करण्यात येईल. जाहिरातीत नमूद केलेली संपुर्ण अर्हता, ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती व मूळ कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास उमेदवारांची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल अथवा अशाच उमेदवारांचे मागीतलेले सामाजिक आरक्षण अथवा वयोमर्यादा शिथिलीकरण, परिक्षा शुल्क इ. सारख्या सवलती नामंजूर करण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.

2. अंतिम निवड

शासन निर्णय सा.प्र. विभाग, प्रानिमं-2007/प्र.क्र.46/07/13-अ, दिनांक 27/06/2008 अन्वये,

अ) उमेदवारांची अंतिम निवड हि लेखी परिक्षेत मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे केली जाईल.

ब) एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना **समान गुण** मिळाल्यास खालील प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.

1. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार, त्यानंतर,
2. मागासवर्ग उमेदवारांच्या बाबतीत प्रथम अनुसूचित जमाती मधील नंतर अनुसूचित जाती, विशेष मागासप्रवर्ग, विमुक्त जाती (14 व तत्सम जाती, भटक्या जमाती जानेवारी -1990 - पुर्वीच्या 28 तत्सम जाती), भटक्या जमाती (धनगर व तत्सम), इतर मागासवर्ग या क्रमाने; त्यानंतर,
3. शारीरिक दृष्ट्या अपंग असलेले उमेदवार त्यानंतर,
4. माजी सैनिक असलेले उमेदवार त्यानंतर,
5. स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य असलेले उमेदवार त्यानंतर,
6. वय (वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवाराचा क्रम वरती लागेल.)

वरील प्रत्येक संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल.

<u>नेमणुकीच्या सर्वसाधारण अटी</u>

1. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकार-यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.
2. नियुक्तीपूर्वी मूळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला आवश्यकता असल्यास अद्ययावत नॉनक्रिमीलेअर दाखला तसेच आवश्यक ती मूळ कागदपत्रे इत्यादीची छाननी संबंधीत नियुक्ती प्राधिकारी यांच्या स्तरावर केली जाईल. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाही. छाननीअंती वरील प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास/ माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही/ नियुक्ती रद्द होईल. तसेच या पदांसंबंधी शासनाकडून आवश्यक सहमती प्राप्त झाल्यानंतरच उमेदवारांना नियुक्तीचे आदेश देण्यात येतील.

ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत

प्रस्तुत पदांकरीता फक्त www.zpjalna.org या अधिकृत संकेतस्थळावरुन विहीत पध्दतीने भरलेले अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे स्विकारण्यात येणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ईमेल आयडी व मोबाईल क्रमांक चूकीचा/अपूर्ण तसेच मोबाईल क्रमांक रजिस्टर्ड () असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रियेदरम्यान त्याव्दारे पाठविल्या जाणा-या सूचना संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई मेल आयडी व मोबाईल संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना जिल्हा निवड समिती जिल्हा परिषद जालना हे जबाबदार असणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

पात्र उमेदवाराला वेब बेस्ड ऑनलाइन अर्ज www.zpjalna.org या वेबसाईटव्दारे दि २५/१०/२०१४ ते दि ०१/११/२०१४ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

उमेदवारांचे अर्ज ऑनलाइन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक कागदपत्रे अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाइन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांचे पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाइन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास काही त्रुटी राहिल्यास व भरतीच्या कोणत्याही टप्पावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील व याबाबत त्यास तक्रार करता येणार नाहीत. ऑनलाइन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहीरातीत नमूद सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण वयोमर्यादा शिथिलीकरण वैगेरे पात्रता तपासूनच ऑनलाइन अर्ज भरावा.

उमेदवाराची लेखी परीक्षा ही त्याने आनलाइन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेंनुसार कोणताही कागदपत्रे पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्याने या परीक्षेत मिळालेल्या गुणांचया आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क रहाणार नाहीत. कागदपत्राच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यात येईल लेखी परीक्षेच्या प्राथमिक चाळणीनुसार गुणवत्तेच्या आधारे , उमेदवाराने ऑनलाइन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करुन् त्याच्या कादपत्रांची सखोल छाननी केली जाईल सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियतुन बाद करण्यात येईल. पात्रताधारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकारी जिल्हा निवड समिती जि.प. जालना यांनी राखुन ठेवलेले आहेत. याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

ऑनलाइन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना www.zpjalna.org या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या संकेतस्थळावर , ऑनलाइन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर state bank of india बँकेत फि भरण्याचे चलन ३ प्रतीमध्ये (उमेदवाराची प्रत, बँकेची प्रत व जि.प. जालना CTR प्रत) उपलब्ध होईल. सदर चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फतच उमेदवाराने चलनात नमूद असलेली आवश्यक फि state bank of india च्या कोणत्याही शाखेत पुढच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी भरता येईल . सदरच्या ३ प्रतीपैकी उमेदवारास त्याची स्वत-ची प्रत, जि.प. जालना (CTR) प्रत उमेदवारास state bank of india या बँकेकडून परत मिळेल त्यापैकी जि.प. जालना CTR प्रत उमेदवारांनी कागदपत्रे छाननीच्या वेळी जि.प. जालना CTR प्रत यांचकडे जमा करावी. सदर चलनाची मूळ प्रत असल्याशिवाय उमेदवाराची कागदपत्रे, छाननी अथवा मुलाखत घेतली जाणार नाही.

बँकेत परीक्षा शुल्क भरण्याचा कालावधी दि २५/१०/२०१४ ते दि ०१/११/२०१४ असा राहील. अंतिम दिनांकानंतर बँकेत परीक्षा शुल्क भरणा-या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.

उमेदवाराने state bank of india च्या कोणत्याही शाखेत पैसे भरल्यानंतर उमेदवाराला त्याची स्थिती www.zpjalna.org या अधिकृत संकेतस्थळावर पुढील कार्यालयाीन कामकाजाच्या दिवशी पाहता येईल.

ऑनलाइन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवारांनी स्वत-चा अद्यावत (latest) विहीत नमुन्यातील पासपोर्ट साईज फोटो व सही स्कॅन करुन www.zpjalna.org या अधिकृत संकेतस्थळावरील सूचनेनुसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे.

ऑनलाइन अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख वेळेनंतर संकेतस्थळावरील ऑनलाइन अर्ज भरण्याची link बंद केली जाईल

ऑनलाइन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहीत परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परीक्षेची रुपरेषा / वेळापत्रक , परीक्षा केंद्ग , बैठक क्रमांक इ बाबतची माहिती वर दिलेल्या www.zpjalna.org या अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. यासंबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. www.zpjalna.org या अधिकृत संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

अपंग संवर्गातील उमेदवाराकडे किमान ४०% अपंगत्वाचे प्रमाणपत्र असल्याबाबतचे स्थायी वैद्यकिय मंडळाचे विहीत प्रमाणपत्र असावे. अपंग उमेदवारास लेखी परीक्षेची वेळी लेखनिकाची मदत आवश्यक असल्यास ऑनलाइन अर्ज भरतांना तसा स्पष्ट उल्लेख करावा. लेखनिकाचे परीक्षेचे शुल्क रक्कम रु १००/- ही चलनाव्दारे परीक्षा शुल्कामध्ये वाढ करुन त्याप्रमपणे भरावी लागेल व ती ना परतावा राहील. ज्या उमेदवाराने लेखनिकाची मागणी अर्जात केलेली नसेल अशा अपंग उमेदवारांना ऐनवेळी लेखनिक पुरविला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. अपंग प्रवर्गातील पात्र उमेदवारांची अंतिम नियुक्ती ही स्थायी वैद्यकिय मंडळाच्या पात्रता प्रमाणपत्राच्या आधारे करण्यात येईल.

ज्या उमेदवारांनी यापुर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्गाकडे सेवायोजन कार्यालय/समाजकल्याण अदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात नावे नोंदविलेली आहेत अशा उमेदवारांना विहीत मुदतीत स्वतंत्ररित्या ऑनलाइन अर्ज करणे व परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील. तसेच प्रकल्पग्रस्त , अंशकालीन अशा उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत संकेतस्थळावर स्वतंत्रपणे ऑनलाइन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत अशा उमेदवारांना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

अंशकालीन उमेदवारांनी त्यांनी सुशिक्षित बेंरोजगार अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत तीन वर्ष दरमहा मानधनावर अंशकालीन काम केलेल्या पदवीधर / पदविकाधारक उमेदवारांनी सदरच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी असणे व तशी नोंद ऑनलाइन अर्जात करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र व सेवायोजना कार्यालयाकडील प्रमाणपत्र उमेदवारांना कागदतपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावे लागेल.

भूकंपग्रस्त / प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचे विहीत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनु. जाती, अनु. जमाती निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गीय यांच्या साठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २०१४

महाराष्ट्र अधिनियमक्र.8) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29 जानेवारी 2004 पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगतगटाचे (क्रिमीलेअर) तत्व वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), आणि भ.ज.(ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग ESBC (मराठा), विशेष मागास प्रवर्ग- अ (मुस्लिम) यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दिनांक 31/03/2014 नंतरचे/अद्ययावत (नॉनक्रिमीलेयर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

16. ज्या महिला उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ हवा असेल त्यांनी तशी मागणी ऑनलाईन अर्जात करणे अनिवार्य आहे. शासन निर्णय महिला व बालकल्याण क्र. 82/2001/म.से.आ-2000/प्र.क्र.415/का.2, दि.25/05/2001 मधील तरतूदीनुसार महिलांसाठी आरक्षण राहिल. या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आरक्षणा अंतर्गत अर्ज करणाऱ्या महिला उमेदवारांनी वर्ष 2014-15 या कालावधी करिता वैध असलेले (अद्ययावत अर्थात 31/03/2015 पर्यत वैध असलेले) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉनक्रिमीलेअर) प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.
17. सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, 28 मार्च 2005 व शासन परिपत्रक एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, 01 जुलै 2005 नुसार विहित केलेल्या नुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम 2005 अन्वये शासनाने गट अ, ब, क, ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापन नमुना(अ) आवश्यक अर्हता म्हणून विहीत नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन बंधनकारक आहे.
18. ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/कागदपत्र पडताळणीस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्यास, एखादया अर्जदाराने त्याचा निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच, नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्यांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
19. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकःबीसीसी 2011/ प्र.क्र. 1064/2011/16 - ब दि. 12 डिसेंबर 2011 नुसार ज्या उमेदवाराची निवड विशिष्ट मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे, अशा उमेदवारास, त्याच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ति आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ति आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील.
20. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी / नियुक्ती रद्द करण्यांत येईल व शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल
21. अपात्र अर्जदारांस स्वतंत्ररित्या कळविले जाणार नाही.
22. परीक्षेस/कागदपत्र पडताळणीस बोलाविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.
23. वरील अटी, शर्ती, नियमांव्यतिरीक्त शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेले आदेश व निर्णय लागू राहतील.

परीक्षा शुल्क

खालीलप्रमाणे शुल्क भरावे लागेल.

खुला प्रवर्ग रु २९०/-, मागास प्रवर्ग रु. १९०/-

(वर दर्शविण्यात आलेले परीक्षा शुल्क बँक प्रोसेसिंग चार्जेस वगळून आहे.)

उक्त परीक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत ऑनलाइन अर्जासोबत प्राप्त झालेल्या चलनाव्दारे भरणे आवश्यक आहे.

टिप _ स्टेट बँक ऑफ इंडियाकडून रु ६०/- इतकी प्रक्रिया शुल्क आकारली जाईल सदर शुल्क उमेदवाराने भरावयाची आहे.

रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	भरती प्रक्रिया कार्यक्रम	दिनांक
१	अर्ज ऑनलाइन पध्दतीने करण्याचा कालावधी	२५/१०/२०१४ ते ०१/११/२०१४ (सायं. ५.३० पर्यंत)
२	बँकेत विहीत चलनाव्दारे परीक्षा शुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक	०१/११/२०१४
३	लेखी परीक्षा दिनांक	११/११/२०१४
४	लेखी परीक्षेचा निकाल संकेतस्थळावर जाहीर होण्याचा दिनांक	१३/११/२०१४
५	गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी दिनांक	१४/११/२०१४

विषेश सूचना

ऑनलाइन पध्दतीने अर्ज करतांना उमेदवारांना कोणताही कागदपत्रे सादर करावयाची आवश्यकता नाही. ज्या उमेदवारांकडे सदर पदांकरीता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी विनाकारण अर्ज करु नये.

अर्जदारांना अर्ज भरण्यासंदर्भात काही अडवणी असल्यास त्यासाठी ९४२०७९४४२४ / ९४२१२०४७५६ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

स्वाक्षरीत /-
सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद जालना

स्वाक्षरीत /-
उपाध्यक्ष
जिल्हा निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद जालना

स्वाक्षरीत /-
अध्यक्ष
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हाधिकारी जालना